MHPA140010632021

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १८.११.२०२१ |
| नोंदणी तारीख | : | १८.११.२०२१ |
| निकाल तारीख | : | १०.०८.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०४ ०८ २३ |

**नियमित फौजदारी खटला क्र. २५४/२०२१** **निशाणी क्र. ३१**

फॉर्म क्र. ३२

**भाग – अ**

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)

(फौजदारी नियमावली चे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(१) प्रमाणे)

| | | |
|---|---|---|
| **विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी**<br>(पिठासीन अधिकारी एस. एस. साळुंखे)<br>**(दिनांक १०.०८.२०२६)**<br>**(नियमित फौजदारी खटला क्र. २५४/२०२१)** | | |
| (गुन्हा क्र. ४२९/२०१९, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३५४, ३५४(१)(२)(३) आणि सह कलम ६६(क) माहिती तंत्रज्ञान अधिनियम प्रमाणे, पोलीस स्टेशन पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी.) | | |
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र सरकार तर्फे पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन पूर्णा, तालुका – पूर्णा, जिल्हा – परभणी |
| सरकार तर्फे – | | श्रीमती व्ही. के. नरवाडे, सहायक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | | विनोद केरबा जोंधळे,<br>वय – ४१ वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा. सिध्दार्थ नगर, पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी. |
| आरोपीतर्फे | | विधीज्ञ श्री. एस. एस. काळे. |

## भाग – ब

(फौजदारी नियमावलीचे प्रकरण ६ मधील परिच्छेद ४४(२) प्रमाणे)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०८.१२.२०१८ ते २५.१२.२०१९ |
| छापील प्रथम खबर अहवालाचा दिनांक | २६.१२.२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | १८.११.२०२१ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | ०५.०९.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०१.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | –– |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १०.०८.२०२६ |
| शिक्षा सुनावणीचा दिनांक, असल्यास | –– |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटण्याची तारीख | गुन्हयाचे आरोप सह | निर्दोष असो वा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीमान म्हणुन असलेला कालावधी फौ. प्र. सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विनोद केरबा जोंधळे | दिनांक ०८.०७.२०२१ रोजी नॉमिनल अटक | दिनांक ०८.०४.२०२० | भा. दं. वि., १८६० चे कलम ३५४, ३५४(३)(२)(१) आणि सह कलम ६६(क) आय.टी.ॲक्ट प्रमाणे | निर्दोष सोडले. | –– | –– |

## भाग – क

(फौजदारी नियमावलीचे प्रकरण ६ मधील परिच्छेद क्र. ४४(३) प्रमाणे)

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालय साक्षीदारांची यादी

अ – अभियोगपक्ष :–

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा. क्र. १ | xxx | फिर्यादी/पिडीत |

ब – बचाव पक्षाचे साक्षीदार, जर असतील तर :–

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क – न्यायालयीन साक्षीदार, असतील तर :–

| अ. क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## फिर्यादी/बचाव/न्यायालय निशाणी क्रमांकाची यादी

अ – अभियोगपक्ष :–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. २९ | फिर्यादीवरील सही |

ब – बचाव :–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

क – न्यायालयीन निशाणी :–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

ड – भौतिक वस्तू :–

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**न्या य नि र्ण य**

(दिनांक १०.०८.२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचे प्रकरण आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३५४ व ३५४(३)(१)(२) आणि सह कलम ६६(क) माहिती तंत्रज्ञान अधिनियमाप्रमाणे चालविण्यात आले.

**अभियोगपक्षाच्या केसची थोडक्यात हकीकत**

२. दिनांक ०८.१२.२०१९ रोजी सायंकाळी ०८.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी ही तिच्या रमाई नगर पूर्णा येथील आईच्या घरी होती. त्यावेळी फिर्यादीचा मोबाईल क्र. ९११२४०२९७७ वर मोबाईल क्र. ९०११५३०८९४ वरुन 'HI' असा मेसेज आला. त्यानंतर फिर्यादीने ''कोण आहे'' असा मेसेज केला असता सदर क्रमांकावरुन ''मी तुम्हाला दररोज पाहतो, तुम्ही मला ओळखले नाही का, मला तुम्ही खूप आवडता I LOVE YOU'' असा मेसेज वारंवार पाठविण्यात आला. त्यावेळी फिर्यादी मोबाईल बंद करुन झोपी गेली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी फिर्यादीने सदरचा प्रकार तिच्या आई वडीलांना सांगितला. त्यानंतर दिनांक २५.१२.२०१९ रोजी रात्री १२.५३ ते १२.५७ च्या दरम्यान व्हॉट्स अप व व्हीडीओ कॉल केल्यामुळे फिर्यादी जागी झाली. तेव्हा तिने पाहिले असता व्हॉट्स अपवर तिचे फोटोचे स्टेटस ठेवले होते. आरोपीने फिर्यादीला भरपूर मेसेज पाठविले होते व रात्री बेरात्री फोन करत होता, त्यामुळे तिला वाईट वाटून लज्जा उत्पन्न होत होती, अशा अशयाची फिर्याद फिर्यादीने पोलीस ठाणे पूर्णा येथे दाखल केली.

३. प्रस्तुत फिर्यादीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे, पूर्णा येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ४२९/२०१९ अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३५४ व ३५४(३)(१)(२) आणि सह कलम ६६(क) माहिती तंत्रज्ञान अधिनियमानुसार नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र नारायण मारकड यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला.

त्यांनी तपासाअंती आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** प्रस्तुत प्रकरणात आरोपी हजर झाल्यानंतर माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्रमांक १८ अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३५४ व ३५४(३)(१)(२) आणि सह कलम ६६(क) माहिती तंत्रज्ञान अधिनियमानुसार दोषारोप ठेवून त्यांना आरोपाचे स्वरुप समजावून सांगितले असता आरोपीने त्याचेवरील आरोप नाकारुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

**५.** अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दा उपस्थित झाला त्याचे निष्कर्ष व कारणे खालील प्रमाणे आहेत.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०८.१२.२०१८ चे सायंकाळी ०८.०० पासून ते दिनांक २५.१२.२०१९ चे १२.४५ व १२.५७ वाजेच्या दरम्यान रमाई नगर, पूर्णा येथे आरोपीने त्याचा मोबाईल क्र. ९०११५३०८९४ वरुन फिर्यादीच्या मोबाईल क्र. ९११२४०२९७७ वर 'आय लव यु' असा मेसेज पाठवला तसेच फिर्यादीला लैंगिक संबंध ठेवण्यासाठी फोन करुन त्रास दिला व तिला लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले, असे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे का ? | .... नकारार्थी. |
| २. | अंतिम आदेश ? | .... आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**६.** प्रस्तूत प्रकरणामध्ये फिर्यादी ही अभियोगपक्षाची महत्वाचा साक्षीदार असून देखील तिने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. तसेच फिर्यादीने निशाणी क्र. २७ वर

तडजोडपत्र व निशाणी क्र. ३० वर पुरावा बंद पुरसिस दाखल केल्यामुळे व पुढील साक्षीदार तपासून अभियोगपक्षास काहीही साध्य होणार नसल्यामुळे मी निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा न असल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहीतेचे कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन माफ करण्यात आले. अभियोगपक्षा तर्फे श्रीमती व्ही. के. नरवाडे सहायक सरकारी अभियोक्ता यांचा व आरोपी तर्फे श्री. एस. एस. काळे यांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u>** –

**७.** तक्रारदार/पिडीत (अ.सा.क्र.१) यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. तसेच आरोपी हे तिचे पती आहेत, ती सन २०१९ मध्ये मौजे पूर्णा येथील रमाई नगर परिसरामध्ये राहत होती, तिचा विवाह आरोपीसोबत सन २००६ साली झाला, सन २०१९ साली ती तिच्या आई वडीलांसोबत राहण्यास होती, तसेच तिला घटनेचा दिनांक तसेच कालावधी आठवत नाही, तिला घटनेबाबत सध्या काहीही आठवत नाही असे कथन केले. तसेच दिनांक ०८.१२.२०१९ रोजी सायंकाळी ०७.०० वाजण्याच्या सुमारास ती रमाई नगर येथे तिच्या आई वडीलांच्या घरात असताना तिच्या पतीने तिच्या मोबाईलवर 'HI' असा मेसेज पाठवला, त्यावर तिने 'कोण आहे' असा उलट मेसेज केला, तसेच ''मी तुम्हाला दररोज पाहतो, मला तुम्ही खूप आवडता, आय लव्ह यू'' असा मेसेज सदर क्रमांकावरुन तिला वारंवार येत असल्या कारणाने तिने मोबाईल स्वीच ऑफ केला, त्यानंतर दुसऱ्या दिवशी मोबाईल सुरु केला असता त्यामध्ये भरपूर मेसेजेस वाईट मजकूरासह पाठवल्याचे तिच्या निदर्शनास आले, तिचा मोबाईल क्रमांक आरोपीने फेसबुक अकाऊंटवरुन घेवून त्यावर त्याने तिला व्हॉट्स अप मेसेजेस, व्हीडीओ कॉल, व्हाईस कॉल केले, तसेच सदर क्रमांकाच्या व्हॉटस अपचे स्टेटस पाहिले असता तिचा तेसेच

आरोपीचा फोटो ठेवला असल्याचे तिच्या निदर्शनास आले, त्यामुळे तिच्या मनास लज्जा उत्पन्न झाली, या सर्व बाबी अभियोग पक्ष सिध्द करु शकला नाही. तसेच फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये झालेली तडजोड लक्षात घेता आरोपीस सदर गुन्ह्यांशी जोडणे उचित होणार नाही. अशा परिस्थितीत तडजोड झालेची बाब लक्षात घेता, यातील आरोपीस निर्दोष मुक्त करणे योग्य व न्यायोचित ठरेल.

८. वरील सर्व ऊहापोहावरुन मी या निष्कर्षास आलो आहे की, फिर्यादी हिचे अभियोग पक्षास साथ न देणे व दोन्ही पक्षाचे न्यायालयाबाहेर तडजोड होणे हे अभियोग पक्षास आरोपीविरुध्दचे अपराध सिध्द करण्यास मारक ठरलेले आहे. त्यामुळे अभियोग पक्ष हे आरोपीविरुध्दचे कोणतेही अपराध शाबीत करण्यास अयशस्वी ठरले आहे. म्हणून आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र.०१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ करीता** –

९. आरोपीने गुन्हा केला ही बाब अभियोग पक्ष शाबीत करु शकला नाही. अशा परिस्थितीत आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, म्हणून मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | आरोपी विनोद केरबा जोंधळे याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३५४ व ३५४(३)(१)(२) आणि सह कलम ६६(क) माहिती तंत्रज्ञान अधिनियम या गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ च्या तरतुदीनुसार रुपये ५०,०००/– चा जामीन व वैयक्तीक जातमुचलका द्यावा. |

| | |
|---|---|
| ४. | पोलीस निरीक्षक, पूर्णा यांना आदेशित करण्यात येते की, एक काळ्या रंगाचा नोकीया कंपनीचा मोबाईल (आय.एम.ई.आय क्र. ३५७२७७०८८४१५५११ आणि ३५७२७७०८८४१५५२९), एक काळ्या निळ्या रंगाचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल आणि एक सिमकार्ड ज्यावर VI असे इंग्रजीत लिहीलेले इत्यादी मुद्देमाल अपील कालावधीनंतर मुळ मालकाची पडताळणी करुन परत करण्यात यावा. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.08.10 17:14:01 +0530

(एस. एस. साळुंखे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पुर्णा जि. परभणी.

दिनांक – १०.०८.२०२६

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Orders are same word for word as per original Judgment/ Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer/Clerk | : | Balasaheb G. Kadam |
| Court Name | : | J.M.F.C., Purna. |
| Date | : | 10.08.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer | : | 10.08.2026 |
| Judgment/Order Uploaded on | : | 10.08.2026 |